Impact Factor – 6.261 Special Issue - 76 Dec. 2018 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

**RESEARCH JOURNEY**

Multidisciplinary International E-research Journal

# HISTORY OF KHANDESH

## खानदेशचा इतिहास



■ GUEST EDITOR ■

**Dr. Vijay Y. Jadhav**

■ EXECUTIVE EDITOR ■

**Prof. Satish M. Borse**

■ CHIEF EDITOR ■

**Mr. Dhanraj T. Dhangar**

RESEARCH JOURNEY

MULTIDISCIPLINARY ONLINE RESEARCH JOURNAL

**This Journal is indexed in :**

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

**For Details Visit To : www.researchjourney.net**

SWATIDHAN PUBLICATI

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261
Special Issue 76 : History of Khandesh
ISSN : 2348-7143
Dec. 2018


| | | |
|---|---|---|
| १६ | खानदेशी कादंबरीतुन उलगडणारे समाजजीवनाचे प्रादेशिक रुप<br>प्रा. देवकर मनोज बबनराव | ६० |
| १७ | खानदेशातील सांस्कृतिक आणि साहित्यिक परंपरांची ओळख : एक अभ्यास<br>प्रा. जवळेकर धनंजय | ६२ |
| १८ | खानदेशाची ऐतिहासिक आणि सामाजिक पार्श्वभुमी : एक आभ्यास<br>प्रा. रामभाऊ देवराव काशीद | ६४ |
| १९ | खानदेशातील कादंबरी आणि कादंबरीकारांची ओळख एक आभ्यास<br>प्रा. एस.आर. साळवे | ६६ |
| २० | कृष्णा पाटिल यांच्या साहित्यातुन प्रदर्शित झालेले सामाजिक चित्रण : एक आभ्यास<br>प्रा.डॉ. शेख हुसेन इमाम | ६८ |
| २१ | खान्देशातील दलित चळवळ : ऐतिहासिक विश्लेषण<br>प्रा.डॉ. निशांत भिमरावजी शेंडे | ७० |
| २२ | जळगांव येथील ऐतिहासिक साधने<br>प्रा.डॉ. जे.डी. गोपाळ | ७३ |
| २३ | खान्देशीय काव्यधारेचा परीसस्पर्श : कवयित्री बहिणाबाई चौधरी<br>प्रा. विजय डी. झुंजारराव | ७६ |
| २४ | भारतीय स्वतंत्रता आंदोलनात खानदेशचा सहभाग<br>सुनिता बी. पाटील | ८० |
| २५ | पेशवाईचा अस्त व खानदेशातील उध्वस्त आर्थिक जीवन<br>प्रा.डॉ. आर.एम. साळुंके | ८३ |
| २६ | खानदेशातील बेलदार समाज<br>डॉ. विवेकानंद लक्ष्मण चव्हाण | ८५ |
| २७ | खान्देशातील साहित्यिक<br>प्रा.डॉ. विजया पाटील | ८८ |
| २८ | शामकुंवर जगजीवन शेठयांचा भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील योगदान<br>मंजुश्री अप्पासाहेब जाधव | ९० |
| २९ | खानदेशातील कादंबरी आणि कादंबरीकाराचा : एक अभ्यास<br>डॉ. एन.डी. नाईक | ९२ |
| ३० | १९ व्या शतकातील खानदेशातील समाजजीवन एक दृष्टीक्षेप<br>डॉ. रावसाहेब भिमराव नेरकर | ९४ |
| ३१ | खानदेशातील शिरपूरचे प्राचीन व मध्ययुगीन, ऐतिहासिक महत्त्व<br>प्रा. परदेशी भगवान ईश्वरलाल | ९६ |
| ३२ | पश्चिम खानदेशातील ख्रिश्चन मिशनऱ्यांचे आरोग्य विषयक कार्याचा ऐतिहासिक अभ्यास<br>प्रा. विजय पुंडलिक साळुंखे | ९९ |

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261
Special Issue 76 : History of Khandesh
ISSN : 2348-7143
Dec. 2018

# कृष्णा पाटिल यांच्या साहित्यातुन प्रदर्षित झालेले सामाजिक चित्रण : एक आभ्यास

प्रा.डॉ. शेख हुसेन इमाम
इतिहास विभाग, मिलिया महाविद्यालय,
जि. बीड.

खानदेशातील कवीता म्हटले की ओघानेच कृष्णा पाटील यांचा उल्लेख येतो. खानदेशात साहित्याची मुबलक निर्मीती झालेली आहे. यातुनच साहित्य चळवळी उभ्याराहिल्या. संख्यात्मक दृष्टिने विचार केला तर खानदेश हे साहित्य निर्मीतीचे भांडार आहे. परंतु महाराष्ट्रातील साहित्य वर्तुळात स्वतंत्र ओळख निर्माण करु शकणारे काही मोजकेच कवी खानदेशात आहेत. त्यातीलच एक नाव म्हणजे कृष्णा पाटील यांचे होय. त्यांनी आपल्या कवीतेद्वारे समाजमनाचा आढावा घेतला. त्यांनी आपल्या कवितातुन समाजातील प्रेमभावना, समाजातील सहसंबध, सर्वनाते सबंध, याबरोबरच या नाते संबधाविषयी चिंतनात्मक विवेचन प्रस्तुत केले आहे. तसेच खानदेशाच्या भुमिचाही उल्लेख त्यांच्या कवितातुन प्रदर्षित होतो. या समाज चित्रणाचे व खानदेशाच्य भुमिचे जे वर्णन त्यांच्या कवितातुन प्रदर्षित झाले आहे. त्याचा आढावा प्रस्तुत शोध निंबधातुन घेण्यात आलेला आहे.

**शोध निबंधाचे उद्देश**

१. कृष्णा पाटील यांच्या काव्यसाहित्याचा आढावा घेणे.
२. कृष्णा पाटील यांच्या खानदेशीभुमी विषयक काव्यांचा परामर्ष घेणे.
३. कृष्णा पाटील यांच्या कवितेतुन प्रदर्षित होणारे सामाजिक चित्रण प्रस्तुत करणे.

कृष्णा पाटील यांनी खनदेशी सामाजाचे, खानदेशी भुमिचे चित्रण आपल्या कवितेतुन केले आहे.कृष्णा पाटील यांनी खानदेशाच्या भुमीचे यर्थाथ व वास्तववादी चित्रण आपल्या कवितेतुन केले आहे.जळगाव जिल्हातुन वाहणाऱ्या तापी नदीचे रुप जिल्हयातल्या लोकांवर किती मोठया प्रमाणात आहे. हे त्यांनी आपल्या खालील कवितेद्वारे स्पष्ट केले आहे.

*जळगाव जिल्हयात या*
*माता तापी वोहे शांत*
*थोर तिच्या पुण्याईने*
*पीक डोले शिवारात*

या कवितेद्वारे जळगाव जिल्हयातील तापी नदीच्या पुण्याईने कशी समृध्दी आली आहे. याचे वर्णन त्यांनी केले आहे. तशाच प्रकारे जिल्हयातील भाषाशैली भौगोलीक परिस्थिती जीवनमान, तिर्थस्थळे, नद्या, डोगंर यांचा परिचय त्यांनी आपल्या अनेक कवितांमधुन करुन दिला आहे. त्यांनी या कवितांच्या माध्यमातुन निसर्गाचे यथार्थ चित्रण केलेले आहे. निसर्गाचे निव्वळ सौदर्य त्यांनी आपल्या कवितेद्वारे शब्दबध्द केले आहे. या बरोबरच खानदेशी भुमित असलेल्या सातपुडा पर्वतरांगा किती महत्वपुर्ण आहेत. याचाही उल्लेख त्यांनी आपल्या कविताद्वारे चित्रीत केले आहे.

*माझ्या गावाच्या शेजारी*
*गिरी थोर सातपुडा*
*पाठिराखा तो आमुचा*
*काय आम्हा तुटवडा?*

या कवितेद्वारे नैसर्गिक देणगी म्हणुन लाभलेला सातपुडा, तेथील समाज जिवनाचा पाठीराखा असल्याचे त्यांनी नमुद केले आहे. सातपुडा पर्वतामुळे येथिल लोकांना कशाचाही तुटवडा भासत नसल्याचे त्यांनी आपल्या कवितेत स्पष्ट केले आहे. कृष्णा पाटील यांच्या कविता व्यक्ती जीवनाचाही परामर्ष घेताना दिसुन येतात. त्यांनी समाजातील अर्धपोटी राहुन कार्य करणाऱ्या कामगारवर्गाचे वास्तवादी चित्रण प्रस्तुत करण्याचा प्रयत्न आपल्या कवितेद्वारे केला आहे.

*माझ्या लहान संसारी*
*राझण तो एका कोनी*
*नाही स्टीलची भांडी*
*मडक्याच्या उतरणी*
*माझ्या लहान संसारी*


Website : www.researchjourney.net Email : researchjourney2014@gmail.com

ISSN : 2348-7143
Dec. 2018

या कवितेतुन समाजातील गरीबी, दरिद्रय आणि त्याची दाहकता त्यांनी स्पष्ट करण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. समाजातील श्रमीकवर्ग दारिद्रियात खितपत पडलेला असताना देखील आशा संकटाना देखील कसा सामोरा जातो याचे वास्तववादी चित्रण त्यांनी आपल्या कवितेद्वारे केले आहे.

समाजात असणारी अध्यात्मीकता यांच्यावरही कृष्णा पाटील यांची कविता प्रकाश टाकते. कवि कृष्णा पाटील यांच्या कवितेतुन व्यक्त होणारा भक्तीभाव त्यांची अध्यत्मिकता, तत्वचिंतन, मध्ययुगाम संतवाङमय यातील भक्तीभावासरखे नसुन अधूनिक काळातील मानसाला ईश्वरीशक्तीचा लागलेला ध्यास, ईश्वराच्या मांगल्याचा, पावित्र्याचा झालेला बोध व्यक्त करते.

*गाढ झोपल्या सागरी तुझी जाग जाणवते*
*समाधिस्थ गीरीतुन तुझी वाणी ऐकु येते*
*शांत अशा या सृष्टित तुझी चाहुल लागते*
*आर्त नि:शब्द वाणीत तुझे गुढ उकलते*

आशा प्रकारे त्यंनी ईश्वराच्या अस्तित्वाचे गुढ आपल्या कवितेतुन शोधण्याचा प्रयत्न केला आहे. ईश्वरास आमृत, निर्वीकार, निर्गणरुप आशा विविध विशेषणातुन संबोधले जाते. त्याचे गुढ त्यांनी आपल्या कवीतेतुन उकलण्याचा प्रयत्न केला आहे.

**समारोप**

कवि कृष्णा पाटील यांनी आपल्या कवितेतुन खानदेशी समाज मनाचा, भुमिचा आढावा प्रस्तुत केला आहे. त्यांनी त्यातुन खानदेशी निसर्गचित्रण समाजातील अध्यात्म, गरीबी, सामाजातील दारिद्रय आशा विविधांगी घटना व घटकांचे यर्थाथ व वास्तववादी चित्रण आपल्या कवितेद्वारे मांडले आहे. त्यांनी आपल्या कवितेतुन समाजातील दारिद्रयावर प्रकाश टाकुन समाजमनाचा शोध घेतला आहे. आशा आवस्थेत असणारा समाजमनाचा ठाव घेण्याचा प्रयत्न केला आहे. या बरोबरच खानदेशातील समाजावर तेथील नैसर्गिक घटकांचा जसे पर्वतरांगा , नद्या यांचा पडलेला प्रभाव स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. एकदंरित खानदेशी समाज घटकांचे मन आणि त्याचे वास्तवादी चित्रण त्यांनी आपल्या कवितेद्वारे चित्रीत केला आहे.

**संदर्भ सूची :**

१. प्रभावती महाजन :- खानदेश भुमी साहित्य आणि साहित्यीक
२. शशिकांत पाटील :- खानदेशचे मराठी साहित्यरुप
३. दिलीप चव्हाण :- खानदेशातील भटकी पंचाळ जमात
४. शशिकांत पाटील :- अहिराणी लोकसाहित्याचा अभ्यास